
# फार फार वर्षापूर्वी




म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा.क
वा. क्र. १६४८६
IRBK-0116448
IRBK-0116448

कथा :: १० ::

८११.८१
वाचणा
१५४४८
२०-३-६२

# फार फार वर्षापूर्वी

IRBK-0116448
IRBK-0116448

लेखक

पंडित देशपांडे

किंमत

एक रुपया

मंगल प्रकाशन : नागपूर १०

प्रकाशिका :

सौ. वीणा तिजारे,
मंगल प्रकाशन,
४, बजाज नगर,
नागपूर १०.

सर्वाधिकार :

मंगल प्रकाशन

प्रथमावृत्ति :
१ जून १९७४

मुद्रक :

श्रीकांत रा. बेडेकर
मोहन प्रिंटर्स,
धंतोली,
नागपूर– १२.

कथानुक्रम

१ सुवर्ण फूल ३
२ युवराज मोहनचंद्र ११
३ इंद्रदेवाचा शाप १६
४ जादूची अंगठी २१
५ राजहंस व प्राणहंस २७

१५४४८
आ वा

# सुवर्ण फूल

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका अरण्यांत एक अतिशय धिप्पाड असा राक्षस राहात होता. तो राक्षस स्वभावानें अतिशय क्रूर व निर्दयी होता. त्याच्या सर्वांगावर लांबचलांब केस होते आणि डोक्याला दोन मोठमोठीं शिंगेंपण होतीं. त्यानें आजपर्यंत कितीतरी तरुण आणि तरुणी बंदिवान करून ठेवले होते.

एके दिवशीं एका आटपाट नगराचा राजा सहज शिकारीच्या निमित्तानें बाहेर पडला व शिकार शोधतांशोधतां नेमका ह्या राक्षसाच्या अरण्यांत आला. राजाला अरण्यांत चोहोकडे वाघ, सिंह, अस्वलें, मोठमोठी अजगरे दिसत पण धनुष्याला बाण लावला कीं तीं सर्व अदृष्य होत. असे बरेच वेळां झालें, पण राजाला शिकार कांहीं मिळाली नाहीं. राजा फारच दमून गेला. त्याला तहान लागली. तो व्याकुळतेनें अिकडेतिकडे पाण्याचा शोध करू लागला. थोड्याच वेळांत त्याला रम्य असें सरोवर दिसलें, त्या सरोवराजवळ नाना प्रकारच्या वेली होत्या. त्याच प्रमाणें फुलाफळांच्या बागाहि पण राजाला दिसल्या. राजाला ती शोभा अगदी अपूर्व वाटली.

राजानें आपला घोडा शेजारच्या एका झाडाला बांधला



आणि तो सरोवराजवळ आला. त्या सरोवरांत नाना प्रकारची आणि सात रंगाचीं कमळें फुललेली दिसत होती. त्या कमळांमध्यें एक अतिशय सुंदर असें सुवर्णाचें फूल होतें. त्या फुलाच्या पाकळ्या क्षणांत मिटत व पुन्हा उघडत. त्या फुलांमधून सप्त-रंगाच्या पाण्याचे तुषार अगदीं मंदमंदपणें पडत होते. बाजूंची कमळांचीं फुलें व त्यामध्यें असणारे सुवर्णाचें हें अद्‌भुत फूल पाहून तर राजा आपली तहान, भूक सर्व कांहीं हरपला. आणि मोठ्या धैर्यानें तो ते 'सुवर्णाचें फूल' हस्तगत करण्यासाठीं तळ्यांत उतरला. अितक्यांत त्या पाण्यांत असणारीं कमळें एकाएकी हसल्याचा आवाज राजाच्या कानीं आला. वादळ सुटल्याप्रमाणें वेली अिकडूनतिकडे हालू लागल्या. वृक्ष डोलू लागले. हा काय प्रकार आहे हें राजाला बिलकूल कळेना. अितक्यांत समोरच असणारें झाड पेटत चाललें आहे. आणि त्या ज्वाळांतून एक अतिशय धिप्पाड असा शिंगें असलेला राक्षस दाण्-

दाण् पावलें टाकीत आपल्याच रोखानें येत आहे असें दिसतां-क्षणींच राजा अतिशयच घाबरून गेला. थोडयाच वेळांत तो राक्षस राजाजवळ आला आणि म्हणाला, "हे राजा, घाबरूं नकोस. तुला जर हे माझे 'सुवर्ण फूल' पाहिजे असेल तर तूं मी सांगतो त्याप्रमाणें केलेस तर तुला मी ह्या फुलासारखी किती-तरी फुलें बक्षीस म्हणून देईन."

"समोरच्या पहाडापलीकडे एक अतिशय मोठें असें वडाचें झाड आहे. त्या झाडाच्या ढोलींत माझा गर्भश्रीमंत भाऊ राहातो. त्याच्या गळयात एक कंठा आहे आणि त्या कंठयामध्यें एक तेजस्वी असा दिव्य मणि आहे. तो मणि जर तूं मला आणून दिलास तर मी तुला फुलें देईन. राजानें त्या राक्षसाजवळून १५ दिवसांची मुदत मागितली आणि 'मी आज पासून बरोबर १५ दिवसांनीं तुमची भेट घेईन' असें सांगून राजा आपल्या राज-धानींत परत आला.

दुसरे दिवशीं राजानें ही गोष्ट आपल्या दरबारांत सांगितली. परन्तु त्या राक्षसाचें वर्णन ऐकून प्रत्येक सरदार आपली मान खालीं घालूं लागले. अितर पराक्रमी सरदार आणि आपले पराक्रमी सात राजपुत्र दुसऱ्या नगरावर चढाई करण्या-करितां गेले असल्यामुळें राजाचा अगदींच उपाय खुंटला. राजपुत्र आल्यानंतर त्यांना ह्या फुलाच्या कामगिरीकरितां पाठवावे असा विचार राजाच्या मनांत येई. परन्तु राजाचें मन फुलांकडे अितके गुन्तलें होतें कीं, कांहीं विचारू नका. केव्हां तें फूल मी माझ्या हातानें आणून आपल्या उद्यानांत लावतो असें राजाला होऊन गेले होतें. या कामगिरीवर कोणीच जात

नाहीं असें पाहून राजा स्वतः जाण्यास निघाला. जातांजातां त्याला पुष्कळ संकटें सहन करावीं लागलीं. परन्तु त्या संकटांना राजानें मोठ्या धैर्यानें तोंड दिले. मजलदरमजल करीतकरीत एकदोन दिवसांतच त्यानें तो प्रचण्ड पहाड कसातरी ओलांडला आणि तिसऱ्या दिवशीं राजा त्या अफाट असलेल्या विस्तीर्ण वडाच्या ढोलीजवळ आला. त्याला ढोली पाहातांच अतिशय आनंद झाला. तो आनंदाच्या भरांत असतां क्षणींच. . .

मेघांचा गडगडाट सुरू झाला. वृक्ष हालूं लागले आणि एकाएकीं जमीन हालल्याचा भास राजाला झाला. राजानें पाहिलेलें वडाचें झाड एकाएकीं दुभंग झालें आणि त्यामधून एक धिप्पाड राक्षस बाहेर आला. त्याच्या डोळ्यांतून आणि तोंडांतून एकसारख्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. गळ्यांत आणि हातापायांत मोठमोठे विषारी नाग त्यानें रुळत ठेवलेले दिसत होते.

हा एकंदर प्रकार पाहून राजा तर चांगलाच घाबरला. . . परन्तु मोठा धीर धरून राजानें त्याला प्रणाम केला व आपल्या आगमनाचा हेतू राक्षसाला सांगितला.

राजाचें एकंदर वर्तन पाहून तो राक्षस मनांत आनंदित झाला व त्यानें राजाला सांगितलें कीं, 'हे राजा, तुला येतांना जें रम्य असें सरोवर लागलें, त्या सरोवरांत एक सप्तरंगी मासा आहे. तो मासा जर तूं माझ्या स्वाधीन केलास तर मी तुला हा दिव्य मणि देईन.' असे म्हणून तो राक्षस क्षणार्धांत अदृश्य झाला. राजा पुन्हा दरमजल करीतकरीत तो त्या सरोवराजवळ आला. त्यानें पुष्कळ वेळपर्यन्त त्या सरोवरांत त्या माशाचा

शोध केला. परन्तु मासा कांहीं त्याला दिसला नाहीं. अखेर मध्यरात्र झाली. वीणेचे मधुर स्वर राजाच्या कानीं पडले. आणि थोडचाच वेळात ते सरोवर इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणें दिसूं लागले. त्या सरोवरात हळू हळू एक अतिशय मोठा परन्तु तितकाच सुन्दर असा मासा वर आला. तो पाण्याच्या पृष्ठ-भागावर येताच त्याच्या प्रत्येक रंगामधून एक अतिशय लावण्य-वती तरुणी बाहेर पडू लागली. त्या सातहि तरुणींच्या हातामध्यें एकएक वीणा होती. थोडचाच वेळांत त्या काठांवर आल्या आणि त्यांनीं नाना प्रकारचे नाच केलें. राग म्हटले. कांहीं वेळानें पुन्हा ते सात रंग हळूहळू कमी झाले आणि त्याचबरोबर वीणेचे मधुर झंकार पण ऐकू येईनासे झालें.

हा एकंदर प्रकार पाहून आपण जागे आहोत कीं स्वप्नांत आहोंत हेंच राजाला कळेनासें झाले. अतक्यांतच एका मोठ्या जाळामधून राजाला पुढील शब्द ऐकू आले, 'हे राजा, ते सुवर्णाचें फूल तूं तीनदां हलविलेस म्हणजे तुला तो अद्‌भुत मासा मिळेल.' राजाला ते राक्षसाचे बोलणे खरें वाटलें आणि त्यानें तें फूल तीनदां हलवितांक्षणींच. . .राजाचा देह कमळा-प्रमाणें झाला आणि तत्क्षणींच. . .एक विकट हास्य राजाला ऐकूं आलें.

राजा गेल्यानंतर थोडचाच दिवसांत ते सातहि राजपुत्र स्वारींत यशस्वी होऊन नगरांत परत आले. नागरिकांनीं घडलेली सर्व हकिगत त्या राजपुत्रांना सांगितली. राजा अजूनहि परत येण्याचीं चिन्हें दिसेना तेव्हा ते सातहि राजपुत्र राजाच्या

शोधास निघाले. परन्तु रस्ता चुकल्यामुळें आतां कोठे जावे आणि सरोवराचा नेमका रस्ता कोणता हे त्यांना अजिबात कळेनासे झाले. त्यांनीं अंधार बराच पडल्यामुळें व पुष्कळ थकल्यामुळें एका मोठ्या झाडाखालीं मुक्काम करण्याचें ठरविलें. त्यांनीं फराळपाणी केले व आता झोपणार अितक्यांत त्यांना एका दूरवर असणाऱ्या ठिकाणी अंधुकसा प्रकाश दिसला. ह्या ठिकाणीं जरूर कोणीतरी राहात असावे असा विचार करून ते घोड्यावर बसले व थोड्याच वेळात ते त्या दिव्याजवळ येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं एक झोपडी होती. झोपडींत एक साधु ध्यानस्थ बसला होता. राजपुत्रांनीं त्याला मनोभावें नमस्कार केला आणि आपण कोणत्या बिकट परिस्थितीत सापडलों आहोंत अित्यादि गोष्टी साधूला सांगितल्या. साधूला त्या मुलांची फारच दया आली. साधूनें त्या मुलांना सांगितले की, 'ते दोन्ही राक्षस अतिशय पराक्रमी आहेत. सुवर्णफुलाचें आमिष दाखवून ते नेहमी लोकांना फसवीत असतात आणि जरूर लागल्याप्रमाणें कमळाला माणसाचा देह देऊन त्यांचे मासहि ते भक्षण करतात. ते दोघेहि अतिशय क्रूर आहेत. परन्तु तुम्ही घाबरू नका. मी तुम्हाला एक मन्त्र शिकवितों. त्या मंत्राचा उच्चार तुमच्यापैकीं जो वडील मुलगा असेल त्यानें केला म्हणजे तुमचा विजय झालाच म्हणून समजा. तुम्ही अगदी आनंदानें आपल्या पवित्र कामगिरीवर चालला आहांत ! देव तुम्हाला खात्रीनें यश देईल.'

त्या सातहि मुलांनीं त्या साधूला नमस्कार केला व त्याचा आशीर्वाद घेऊन ते आपल्या ठिकाणीं परत आले. सूर्योदयापूर्वींच सर्व कांहीं व्यवस्थित करवून ते आपल्या कामगिरीवर निघाले.

संध्याकाळच्या सुमारास ते त्या रम्य सरोवराजवळ आले. सरोवरांतली कमळें त्याचप्रमाणें सुवर्णफूल वगैरे पाहून त्यांना एकंदर प्रकाराची खरी जाणीव झाली. त्यांनीं क्षणाचीही क्षणभरहि वेळ वाया जाऊं न देतां आपले घोडे भरधाव सोडले. व त्या वृक्षाजवळ आले. त्या वृक्षामधून तो राक्षस त्यांच्यावर चालून आलेला दिसतांच त्यांच्यापैकीं वडील भावानें साधूनें शिकविलेला मंत्र म्हटला. मंत्र म्हणतांक्षणींच तो राक्षस आपोआप जागच्या जागीं जळून भस्म झाला. त्याच्या गळचांत असणारा मणि मात्र अगदीं जसा होता तसाच राहिला. तो मणि घेऊन ते राजपुत्र एकदोन दिवसांतच त्या रम्य सरोवराजवळ आले आणि पाहातात तों एक राक्षस मोठमोठ्यानें पावलें टाकीत हातामध्यें नंगी तलवार घेऊन आपल्याकडे येत आहे, असें पहातांच हे राजपुत्र घोड्यावरून खालीं उतरले आणि त्याच्या सामोरे जाऊन त्यांनीं 'आमच्या वडिलांना तूं सोडशील तर बरे आहे. नाहींतर तुझ्या प्राणाशीं गाठ आहे' असें राक्षसाला सांगितलें. परन्तु राक्षसाचें लक्ष त्या वडील भावाजवळ असणाऱ्या त्या दिव्य मण्याकडे लागलें होतें. कोणताहि विचार न करतां त्यानें त्या वडील राजपुत्रावर उडी मारली. उडी आलेली पहातांच तिचा प्रतिकार करण्यासाठीं तत्पर असतांनाच त्याच्या हातांतील तो दिव्य मणि निसटला व त्या सरोवरांत पडला.

दिव्य मणि सरोवरांत पडला असें पाहतांच त्या वडील राजपुत्रानें मंत्र म्हणण्यास सुरवात केली आणि तत्क्षणींच हाहि राक्षस जळून भस्म झाला.

सरोवरांत पडलेला तो दिव्य मणि त्या सप्तरंगीं माशानें

गिळल्याबरोबर त्या माशाच्या सातहि रंगांतून सात तरुणी वर आल्या. त्याच्या प्रत्येकीजवळ एकएक सुवर्णकलश होता. त्यांनीं त्या कलशांतील पाणी कमळावर शिंपडण्यास सुरवात केली. त्यासरशी त्या कमळामधून राजपुत्र बाहेर पडले. राजाहि त्या कमळांतून बाहेर पडला व धांवत जाऊन त्यानें आपल्या मुलांना मिठी मारली. त्या सात तरुणींनी त्या सात राजपुत्रांशीं लग्न लावले. नंतर मोठ्या आनंदानें राजानें तें सुवर्णफूल आपल्या राजवाड्यांत वाजतगाजत आणून आपल्या सरोज उद्यानांत त्याची स्थापना केली.

# युवराज मोहनचंद्र

फार फार वर्षांपूर्वीची ही एक गोष्ट आहे. एक मोठें नगर होतें. त्या नगरांत एक सुशीलचंद्र नांवाचा राजा राज्य करीत होता. आपल्या नगरांत तो प्रत्येकाला समानतेनें व आदरानें वागवीत असे. नगरांतील व आजूबाजूच्या नगरांतील प्रत्येक गुणी माणसांना राजाकडून मानसन्मान मिळूत असे. इनाम मिळत असे. दर चैत्री पौर्णिमेला राजा आपल्या दरबारांत कलावंतांचे निरनिराळे कार्यक्रम ठेवून त्यांचा आदर करीत असे. सुशीलचंद्राच्या राज्यांत प्रजाही सुखी होती. सदाचरणी व सुशील होती. शेतकरी शेतांत राबून धान्योत्पादन मुबलक प्रमाणावर करीत असत. यदाकदाचित् दुष्काळ पडला तर राजा धान्याची कोठारं प्रजेसाठीं मोकळी करीत असे. राज्यांत ज्या ज्या कांहीं गोष्टी असतील त्या त्या सर्व प्रजेच्या आहेत. त्या सर्वांच्या वतीनें मी एक प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे असें तो इतरांना सांगत असे. राजाबद्दल हा असणारा प्रजेविषयीचा अभिमान मोठेपणा पाहून प्रजा राजाला पितृसमान मानत असे.

नगरांत सगळीकडे सुखसमृध्दी शांती आणि वैभव गुण्यागोविंदाने नांदत होती.

सुशीलचंद्र राजाची ही भरभराट विजयनगराच्या उग्रसेन राजाला पाहवली नाही. एक दिवस त्यानें आपल्या सशस्त्र सैन्यानिशीं मंगलनगरावर स्वारी केली आणि मंगलनगराचा राजा सुशीलचंद्राला कैदेंत टाकले.

त्यावेळीं पाळण्यांत झोपलेल्या गादीचा वारस मोहनचंद्रास सुशीलचंद्राच्या स्वामिनिष्ठ शिपायानें आपल्या पोटाजवळ घेऊन मंगलनगरांतून तो कोणास नकळत नाहींसा झाला.

विजयनगराच्या राजानें त्याला खूपखूप शोधले पण तो सांपडला नाहीं. अखेर जंगलांत वाघाच्या किंवा एखाद्या हिंस्त्र श्वापदाच्या भक्षस्थानीं पडला असेल असा मनाशीं विचार करून राजाने नाद सोडून दिला. आणि राजा मंगलनगरावर आपला झेंडा लावून राज्य करू लागला.

गादीवर येतांच विजयनगराच्या राजानें मंगलनगरांतील कलावंताचीं वर्षासनें बंद केली. जुने जाणते मंत्री यांना सेवा-मुक्त केले. शेतकऱ्यांकडून जबरदस्तीनें धान्य वसूल करण्यास सुरवात केली.

अकालीं घडलेल्या ह्या घटनेनें मंगलनगराची प्रजा त्रस्त झाली, हवालदिल झाली.

उग्रसेन मात्र दिवसेंदिवस उग्ररूप धारण करीत होता. आणि हस्तें परहस्तें प्रजेला छळीत होता. राज्यांतील सर्व प्रजा त्रस्त व असंतोषित झालेली होती. दिवसारात्रीं ज्याला सापडेल त्या मार्गानें प्रत्येकजण मंगलनगरीच्या प्रजेला लुटीत होता. असेच खूप काल चाललें. इकडे मंगलनगरीच्या राजाचा स्वामि-निष्ठ सेवक कालीदास युवराज मोहनचंद्रास निरनिराळ्या

प्रकारचें शिक्षण देऊन प्रत्येक कलेंत निपुण करीत होता.

मोहनचंद्र हळुहळू मोठा होत होता. कालीदासानें मोहनचंद्रास घोड्यावर बसणे, तलवार आदी शस्त्रें चालविणें, पाण्यांत पोहणे, कडेकपारीतून गनिमिकाव्यानें लढणे, दांडपट्टा खेळणें इत्यादी राजास आवश्यक असणाऱ्या शस्त्रांस्त्रात निपुण केलें.

मोहनचंद्र आतां वीस वर्षाचा तरुण झाला. तेव्हा कालीदासानें मागे सर्व घडलेली हकिकत सांगून त्याच्यांत युवराजाचा स्वाभिमान प्रज्वलित केला. व तुझे आई-वडिल उग्रसेनाच्या कैदेंत वर्षानुवर्ष खितपत पडले आहेत याची मोहनचंद्रास जाणीव करून देतांच मोहनचंद्र रागानें लाल झाला. त्याची तळपायाची आग मस्तकाला गेली. काय करावे अन् काय नाहीं या अदोचल स्थितींत तो पडला. त्याला काहीच गोड लागेना.

रात्रंदिवस एकच एक ध्यास आपले आईवडील मुक्त होतील कसे ?

परंतु एकटा मोहनचंद्र तरी काय करणार ?

त्याची मनोव्यथा कालीदास यानें जाणली. तो स्वामिनिष्ठ सेवक होता. आपण यांतून निश्चितपणें कांहीतरी मार्ग काढू असें त्याला आश्वासन दिलें आणि तो तेथून निघाला.

परंतु मोहनचंद्र दुःखानें व्याकुळ होऊन लहान मुलासारखा रडू लागला.

अरण्यांतील झाडांना, वृक्षवेलींना तो वेड्यासारखा विचारू लागला. "मला मदत करा, मला मदत करा. मी तुमचा जन्मभर ऋणी राहीन. बिचारे मुके काय बोलणार ? वाऱ्याला झुलवीत वेली थरारल्या, झाडांची पानें सळसळली तेवढेच मोहनचंद्राला

बरे वाटलें.

एकदां असाच तो एका खडकावर बसला असतांना . . .

धांवा धांवा असा त्याच्या कानावर आवाज आला. अरण्यांत खात्रीनें कोणीतरी संकटांत सापडले असावे असा मनाशी विचार करून त्यानें कमरेची तलवार सावरली आणि घोड्यावर स्वार झाला व आवाजाच्या अनुरोधानें त्यानें आपला घोडा सोडला.

बघतों तर काय ?

एक राजचिन्ह धारण केलेला मानव एका गुहेच्या तोंडाशीं उभा होता आणि समोर आपला अक्राळविक्राळ जबडा उभारून चिभल्या चाटीत वाघ उभा होता.

हे सर्व पाहतांच मोहनचंद्रानें एक क्षणभरच त्या मानवाची व्यथा ओळखली आणि आपल्या बाहूवर असलेला बाणभाता काढून त्यांतील अत्यंत विषारी बाण त्या वाघावर सोडला.

तात्काळ त्या वाघाचें धड जमीनदोस्त झालें.

मोहनचंद्राचा हा डोळयांत भरणारा असा अद्वितीय पराक्रम पाहून राजा इंद्रजित विस्मयचकित झाला.

काळाच्या दाढेंतून सुटल्यानंतर इंद्रजित राजानें मोहनचंद्राला कडकडून मिठी मारली व युवराजांची विचारपूस केली.

घडलेला सर्व वृत्तांत, सगळी परिस्थिती, पाहिजे असणारी मदत, सगळे मनमोकळेपणानें त्याने इंद्रजित राजाला सांगितलें.

घडलेला वृत्तांत ऐकताच इंद्रजित राजानें तात्काळ मदत देण्याचें मान्य केलें.

तोपर्यंत कालीदासही इतर राजांचे मदतीचें आश्वासन घेऊन माघारी आलेला होताच.

सिंह मनांतल्या मनांत आनंदित होत होता परंतु बाहेर इंद्रदेवांनीं खरोखरच चूक केली असें भासवीत त्यानें अश्वमहाराजांचा निरोप घेतला.

सभेला सुरवात झाली असेल नसेल तोंच सिंह तेथें गेला. इंद्रदेवांनीं अश्वमहाराजांची बराच वेळा वाट पाहिली. सरते शेवटीं अश्वमहाराज कां आले नाहींत, आजारी वगैरे कांहीं आहेत काय याची चौकशी केली तेव्हां सिंह शांतपणें उठून उभा राहिला आणि त्यानें घडलेली सर्व हकीकत इंद्रदेवांच्या कानांवर घातली.

एकंदर हकीकत ऐकून इंद्रदेवाला अतिशय राग आला. त्या रागाच्या भरांतच पुढचा मागचा कांहींएक विचार न करतां त्यांनीं आपल्या दूतांना आज्ञा केली, "त्या उन्मत्त अश्वाला मुसक्या बांधून दरबारांत हजर करा."

इंद्रदेवाची आज्ञा मग काय ! लगेच दहापंधरा दूत भूतलावर गेले आणि त्यांनीं अल्पावधींतच अश्वमहाराजांना इंद्रदेवापुढें हजर केलें.

अश्वमहाराजांना अतिशय अपमान वाटला. हा मानव आपल्यावर सत्ता गाजवितो म्हणजे काय ? हें प्रकरण तर त्यांना विलक्षणच वाटलें. आपल्या प्रजाजनांसमोर आपला झालेला अपमान तर अश्वमहाराजांना बिलकूल सहन झाला नाहीं. त्यांनीं पुढचा मागचा कांहीएक विचार न करतां इंद्रदेवावर चाल केली.

अश्वमहाराज असें कांहीं करतील अशी कल्पना इंद्रदेवांना प्रथमपासून होतीच. अश्वराज चाल करून आलेले बघतांच इंद्र-

देव आपल्या आसनावरून उठले आणि आपल्या अद्‌भूत अशा शक्तीनें त्यांनीं तिथल्या तिथेंच त्या अश्वमहाराजांची शिगें समूळ उपटून हवेंत भिरकावून दिलीं आणि त्याला शाप दिला कीं,

"तुझा खरोखरच अधःपात झाला आहे ज्या शिंगाच्या जोरावर तूं माझ्यावर चाल करून आलास ती शिंगें इथून पुढें तुला, इतकेच नव्हे तर तुझ्या पिढ्यान पिढ्या जगाच्या अंता-पर्यंतहि उगवणार नाहींत. मानव प्राण्यावर तूँ चाल केलीस, इथून पुढें हाच मानव प्राणी तुझा वाटेल तसा उपयोग करील. इतकेच नव्हे तर तुझ्यापाठीवर बसण्यांत त्याला अति आनंद वाटेल. तुला कोणी मोकळे सोडणार नाहींत. सदैव तुझ्या नाकांत लगाम घालूनच लोक तुझा हवा तसा उपयोग करून घेतील." अशा शाप देऊन इंद्रदेवांनीं रागाच्या भरांतच अश्वमहाराजांना भतलावर जोरानें ढकलून दिलें आणि जंगलाचें राज्यपद सिंहाला दिलें तेव्हांपासून जंगलचा राजा सिंह झाला आणि घोड्याला शिंगें अजिबातच येईनाशी झालीं.

--○--

# जादूची अंगठी

फार दिवसांपूर्वींची गोष्ट आहे. विजयनगर नांवाचें एक राजधानीचे गांव होतें. सदा सर्वदा त्या गावांची एकसारखी भरभराट होत असे.

त्यागांवची सर्व दृष्टींनीं भरभराट असूनहि तेथील राजा नेहमी उदास दिसे. त्याला एकाच गोष्टीची विवंचना असे. ती म्हणजे त्याला मुलंबाळं वगैरे कांहीं कांहीं नव्हते. अनेक उपाय केलें, नवस केलें परंतु त्याची इच्छा कांहीं परिपूर्ण होईना. अखेर शेवटीं कोणाचा तरी मुलगा आपण दत्तक म्हणून घेऊन तोंच आपल्या राज्यावर बसवावा असा त्यानें आपल्या मनाशीं विचार करून त्यानें नगराबाहेर असणाऱ्या परमपूज्य तपस्वी असे जे विद्वान महंत- बाबा, त्यांना विचार सांगितला. परंतु त्या महंतबाबानें सांगितलें कीं, "हे राजा ! तूं म्हणतोस तें खरे, परंतु एवढ्या मुलांतून राज्यावर बसविण्यासाठीं गुणवान् सुशील, विनयी व पराक्रमी मुलगा शोधून काढणें अतिशय कष्टाचें काम आहे. तेव्हां मी तुला एक उपाय सांगतो. त्याप्रमाणें जर तूं केलेस तर तुला एका तेजस्वी पुत्राची प्राप्ति होईल. असें म्हणून त्या महंतबाबानें

कांहींतरी मंत्र उच्चारले आणि आपली बंद केलेली मूठ उघडली व त्यांत असणारी अतिशय तेज:पुंज जादूची अंगठी राजाला दिली आणि सांगितलें कीं, ज्या मुलाच्या मधल्या बोटांत ही अंगठी व्यवस्थित बसेल आणि ह्या अंगठीचें तेज पूर्वीपेक्षांहि जास्त वाढेल असाच मुलगा तू दत्तक घेऊन आपल्या राजगादी-वर बसव. महंतबाबाचें बोलणें ऐकून राजा त्यांचा आशीर्वाद घेऊन आपल्या राजधानींत परत आला.

दुसऱ्या दिवशीं राजानें आपल्या नगरांत दवंडी पिटवली कीं, "राज्यकारभार पुढें चालविण्यासाठीं एक मुलगा मी दत्तक म्हणून घेणार आहे. तेव्हां प्रत्येक मुलाच्या आईबापानें किंवा स्वत: मुलानें कां होईना पण राजवाड्यांत यावे. ज्यांचा मुलगा पसंत पडेल तो मुलगा पुढें या राज्याचा राजा होईल. तेव्हां प्रत्येक माता-पित्यानें राजाच्या सुखागाठीं आपला मुलगा घेऊन न विसरतां राजवाड्यांत यावे."

दुसऱ्या दिवशीं राजाच्या दवंडीप्रमाणें प्रत्येक मुलाचे आईबाप आपल्या मुलाला व्यवस्थित, नीटनेटका पोशाख घालून राजवाड्यांत घेऊन आले. राजा त्यांना प्रश्न विचारी. नंतर खाऊं देई आणि आपल्याजवळ असणारी अंगठी त्या मुलाच्या बोटांत घाली. परंतु कांहीं मुलांच्या बोटांत ती अंगठी मोठी होई व कांहींच्या बोटांत लहान होऊन काळीठिक्कर पडे. कांहींच्या बोटांत व्यवस्थित बसे, परंतु लगेच काळीठिक्कर पडे. असें प्रकार त्या अंगठीबाबत होत.

राजाच्या या प्रकारामुळें प्रत्येकजण भिती बाळगूं लागला. राजालाहि आतां काय करावें अशी पंचाईत पडली. त्यानें पुन्हां

आसपासच्या खेडयापाडयांतून दूरदूरचे राजे, गरीब, सरदार वगैरे लोकहि आपापल्या मुलांना घेऊन विजयनगरांत आले, परन्तु त्यांचीहि परिस्थिति कींव करण्यासारखी होऊन गेली. सर्व लोक भीतीनें, आश्चर्यानें अगदींच भारावून गेल्यासारखे दिसत. ह्याच परिस्थितींत आणखी पांच सात वर्षे गेली. परन्तु राजाला पाहिजे असा मुलगा मिळाला नाहीं.

प्रत्येकजण त्या अंगठीच्या भीतीनें राजवाडयांत येण्यास कां कूं करूं लागला. कांहीं कांहीं लोकांनीं तर आपल्या पुण्याईमुळें कां होईना परन्तु मुलाला पुढें सुखाचे चार दिवस दिसावे म्हणून मोठमोठया धर्मशाळा बांधल्या, विहार बांधले, विहिरी खोदल्या, झाडें लावली, भिकाऱ्यांच्या धनधान्यांनीं झोळया भरल्या, पण त्यांच्याहि मुलांच्या बोटांत अंगठी काळी ठिक्कर पडे.

या परिस्थितींत पुन्हा चार वर्षें आणखी गेली परन्तु अंगठीला कांहीं वारस मिळेना. लोकहि राजवाडयाच्या बाजूला अजिबात फिरकेनासे झाले.

राजालाहि आपल्या ह्या विचित्र प्रकारच्या पणाची भिती वाटूं लागली.

'पण' मागें घ्यावा तर एकाद्या कुपुत्राला मांडीवर घेण्याची पाळी यावयाची. बरें न घ्यावा तर आपलें उतार वय बरेच होऊनहि हवा तसा मुलगा अद्याप आपल्याला प्राप्त झाला नाहीं. तो केव्हां मिळणार ? त्याच्याशीं आपण कसें बोलणार, त्याला राज्यावर केव्हां बसविणार इत्यादि होईपर्यंत आपण मध्येंच मेलो तर, अशा एक ना हजारों शंकांनीं राजाचें मन अगदीं पोखरून गेलें होतें.

राजवाड्याकडे कोणीच फिरकेनासें झाल्यामुळें राज्याची परिस्थिति मोठी नाजूक झाली होती.

आणि एके दिवशीं......

संध्याकाळची वेळ होती. सूर्य नारायण आपला रथ घेऊन मोठ्या ड़ौलानें पश्चिमेच्या दिशेकडे चालले होते. पक्षी चोंचीत चारा घेऊन आपल्या पिलांसाठीं घरट्याकडे जात होते. सोनेरी किरणं आपल्या किरणांद्वारें भूमीवर अमृत सिंचन करीत होते. आणि अशा वेळीं अतिशय तेजस्वी दिसणारा गुराखी आपल्या हातांत एका कोवळ्या वासराला घेऊन घराकडें चालला होता. त्या गुराख्याचें वय फार तर १४–१५ वर्षांचें असेल.

अत्यंत तेज:पुंज कांति, बाळसेदार चेहरा, पाणीदार डोळे. चालण्यात विशेष प्रकारची ऐट होती. एकंदरींत स्वारी एखाद्या राजपुत्राप्रमाणे दिसत होती.

तो मधूनच हातांतील वासरू सोडून देई, पुन्हां ते पकडी. असा त्या दोघांचा खेळ चालला होता. सरते शेवटीं ते वासरूं त्याला झुकांडी देऊन रानांतून राजवाड्याच्या रोखानें धावत आहे. असें दिसताच तो मुलगाहि त्याच्या रोखानें राजवाड्या-समोर पळत आला. आणि त्यानें मोठ्या युक्तीनें ते पळत असणारे वासरूं पकडलें. त्याच्या गळ्यांत दोर अडकवून तो घराकडे परत फिरणार इतक्यांत...राजाच्या शिपायांनीं त्याला आपल्या बरोबर येण्यास सांगितलें. तो मुलगा न घाबरतां आपल्या छोट्या वासराला घेऊन त्यांच्याबरोबर निघाला. बऱ्याच वेळानें ते शिपाई आणि हा गुराखी राजाजवळ येऊन पोहोचले.

राजानें त्या मुलाला कपडे घातले,अ लंकार घातले. अगोदरच



सुंदर असणारा तो मुलगा आतां एकाद्या राजपुत्रा-प्रमाणे दिसूं लागला. राजानें त्याला चमचमीत पदार्थ खाऊं घालून त्याला निरनिराळे प्रश्न विचारले. आपल्या शंका विचारल्या परन्तु प्रत्येक प्रश्नाचें उत्तर अथवा शंकेचें निरसन त्यानें मोठ्या कल्पकतेनें करून राजाची अपेक्षा परिपूर्ण केली.

राजानें नंतर त्या मुलाच्या बोटांत अंगठी घालतांच ती अधिकच प्रकाशमान दिसू लागली आणि त्याच्या बोटांत ती व्यवस्थित बसली. हा प्रकार पाहून राजाला अतिशय आनंद वाटला व त्याला त्यानें प्रेमभरानें आपल्या हृदयाशीं कवटाळले. नंतर त्याची विचारपूस करून त्याच्या आईबापाला, भावा-बहिणींना मोठ्या आदरानें नगरांत आणून त्यांचा सत्कार केला. त्याना मोठी जहागिर दिली.

पुढे लवकरच महंतबाबाच्या आज्ञेप्रमाणें राजानें त्या गुराख्याला दत्तक घेतले व महताच्या देखरेखीखालीं त्या मुलाला राज्याभिषेक केला.

अशा रीतीनें चोंहीकडे आनंदीआनंद झाला व राजा-प्रजा सुखी झाली.

--०‿०--

# राजहंस व प्राणहंस

फार दिवसांपूर्वींची ही एक गोष्ट आहे. सौभाग्य नगरांत एक महान पराक्रमी राजा आपल्या बायकापोरांसह सुखासमाधानानें राज्य करीत होता.

राजाच्या वडील मुलाचें नाव प्राणहंस असें होतें. आपल्या दोन्ही राजपुत्रांना राजानें तज्ज्ञांकडून शस्त्रास्त्र, न्याय, सेवा इत्यादीचें शिक्षण दिलेलें असल्यामुळें हे दोघेहि राजपुत्र आपल्या बापाप्रमाणेंच हुषार निघाले होते.

आपल्या मुलांची हुषारी पाहुन दोघां मातापित्याला अतिशय आनंद होत असे. त्याचबरोबर त्यांच्या मनाला दुःखहि होत राजपुत्र जसजसे मोठे होऊं लागले तसतसे राजाचें मुख काळवंडू लागले.

आपल्या वडिलांना काळजींत पाहून दोघा राजपुत्रांनीं विचारलें "बाबा, आपण कसली काळजी करतां ? राजानें पुष्कळ उडवाउडवीची उत्तरे दिलीं परन्तु मुलांचा वाढता हट्ट पाहून धीरगंभीरवाणीनें राजा सांगू लागला.

"बाळांनो ऐका तर . . . .

तुमच्या जन्मोत्सवाची वेळ होती. त्यावेळीं राजघराण्याचें

वैभव म्हणुन रत्नजडीत ताईत मी राजहंसाच्या गळ्यांत घातला होता. आम्ही सर्व हत्तीवरून शर्करा वाटत असतांना आणि राजे-महाराजांच्या देणग्या स्वीकारीत असतानाच एक भला मोठा राक्षस नकळत अन्तपुरांत शिरला आणि त्याने तो रत्नजडीत ताअीत पळविला. त्या ताअीताचें वैशिष्ठय असें आहे कीं ज्याच्या घरीं तो पूजला जाअील त्याची सर्वतोपरीनें उत्तरोत्तर प्रगति होअील आणि ह्याच अद्‌भुत ताअीताच्या प्रभावामुळें तो राक्षस अतिशय अुन्मत्त झाला आहे. मी ताअीतासाठीं दहावेळां युद्ध केलें परन्तु मला यश येण्याएजीं मनुष्यहानीचें महान पातक मला पदरात ध्यावे लागलें. त्यानंतर मी पुष्कळ वेळां दरबार भरवून जो कोणी तो ताअीत परत मिळवील त्याला अर्धे राज्यहि देण्याचें कबूल केले. परन्तु राक्षसाचें सामर्थ्य अचाट असल्यामुळें कोणीच पैजेचा विडा अुचलण्यास तयार होईना.

तो ताअीत म्हणजे आपल्या सौभाग्यनगरीचें वैभव आहे. तें वैभव मला पाहायला मिळावं इतकेंच नव्हें तर मरतेसमयीं देखील माझ्या ड़ोळ्यासमोर असावे अशी माझी अुत्कट इच्छा आहे. आणि ह्याच इच्छेला अनुसरून मी तुम्हांला तज्ञांच्या सहाह्यानें बालवयांतच राज्यशास्त्रांत प्रवीण केले." असें म्हणून राजा दुःक्षाश्रूंना वाट करून देऊं लागला.

राजहंसानें तत्क्षणींच प्रतिज्ञा केली आणि रत्नजडीत ताअीत आणण्यास निघाला. वाटेंत मजलदरमजल करीत बापानें सांगितल्याप्रमाणें राक्षसाच्या रूपनगराजवळ जाण्याचा प्रयन्त करीत असतांनाच . . .

संध्याकाळ झाली आणि अरण्य ओलांडण्यापूर्वींच त्याला

काळोखानें गांठलें असल्यामुळें आपण आतां रात्रभर एका झाडाखालीं मुक्काम करूं आणि पहांट होण्यापूर्वीच नगरांत जाऊं, असा विचार करून त्यानें आपला घोडा सोडला. त्याला वैरण घालून स्वत:हि त्यानें फलाहार केला आणि पाणी पिण्यास शेजारच्या ओढयाकाठीं जातो न जातो तोंच तो राक्षस नागाच्या रूपानें त्या ठिकाणीं आला व आधींच बेसावध असलेल्या राजहंसाला त्यानें कडकडून दंश केला. राजहंस तत्क्षणींच मरण पावला.

पहांटची वेळ होती. जिकड तिकडे शान्तता पसरलेली होती अशा वेळीं एक महान तपस्वी ब्राह्मण त्या दाट जंगलांतून मार्ग आक्रमण करीत असतांनाच त्याची नजर सर्पदंशानें काळचाठिक्कर पडलेल्या राजहंसाकडे जातांच त्याला भडभडून आले. हा कोणीतरी राजपुत्र असावा हें त्यानें लगेच ताडलें.

त्यानं लगेच कांहींतरी मंत्र मनातल्या मनांत पुटपुटलें व आपल्या कमरेचा शेला साडून त्यांत राजहंसाला बाधलें आणि त्याचें प्रेत विशाल वटवृक्षाच्या फान्दीला अडकवून तो जालीम विषाला जाळून टाकणारी वनस्पति आणण्यासाठीं हिमालय पर्वताच्या राखानें पावलें टाकूं लागला.

राजहंसाला स्वा[illegible]वर जाऊन आजपावेतों महिना दीडमहिना झाला तरी तो परत येत नाहीं असें पाहून सर्वांनाच काळजी पडली.

आपल्या भावाचे खात्रीनें कांहीतरी बरें वाईट झालें असावे असा विचार करून प्राणहंस भावाच्या शोधार्थ निघाला. थोडक्यांत दिवसाच्या अवधीत प्राणहंस सपनगेरच्या

आसपास असणाऱ्या घनदाट अरण्यांत येऊन पोहोचला.

दशम्या खाऊन इकडे तिकडे पाण्याच्या शोधार्थ भटकत असतांनाच त्याची नजर राजहंस नेहमी हातांत घालीत असलेल्या अंगठीवर गेली. त्यानें तत्क्षणींच अंगठी उचलली आणि निरखून पाहतांच ही अंगठी खात्रीनें राजहंसाचीच आहे असें आढळल्याबरोबर आपला भाऊ खात्रीनें पळविला गेला असावा किंवा श्वापदाकडून मारला गेला असावा अशा विचारांनीं त्याच्या मनावर साम्राज्य प्रस्थापित करतांच तो एकाएकीं मोठमोठ्यानें रडूं लागला. आणि त्याच वेळेला एक तेजःपुंज अशा कान्तीचा साधु पांढऱ्याशुभ्र घोड्यावर बसून आपल्याकडेच येत आहे असें पाहातांच प्राणहंस रडण्याचें थांबला.

थोडक्याच वेळांत साधु त्याच्याजवळ आला आणि म्हणाला,

"बाळा, तू कोण ? येथें कशाला आलास ? सर्व काहीं सांग. तूं मला माझ्या मुलाप्रमाणें आहेस."

साधूचें हें प्रेमळ भाषण ऐकतांच प्राणहंसानें आपण कोण, येथें कशाकरिता आलों इत्यादि सर्व गोष्टी सांगून त्या साधूचें मोठ्या प्रेमानें पाय कवटाळून मला आपण मार्ग दाखवा अशी विनंती केली.

प्राणहंसाचें एकदर वर्तन पाहतां त्या साधूला अतिशय आनंद झाला आणि त्या आनंदाच्या भरातच तो समोर असणाऱ्या वट वृक्षावर चढला व गर्द पानाच्या डहाळीला बाधलेले राजहंसाचें गाठोडें घेऊन त्वरित खालीं उतरला.

गाठोड्यांतून राजहंसाचें प्रेत काढून त्यानें मंत्र म्हणण्यास व

त्याच बरोबर हिमालय पर्वतांतून आणलेल्या वनस्पतीचा रस राजहंसाच्या सर्वांगावर चाळण्यास सुरवात केली.

थोडक्याच वेळात राजहंस खडखडीत बरा झाला आणि सद्‌गदीत अन्त:करणानें त्यानें आपल्याला जावदान देणाऱ्या त्या पूज्य महात्म्याच्या गळ्यांत प्रेमानें मिठी मारली.

दोघा भावांचें एकंदरीत वर्तन पाहताच तो साधु मनातल्या मनांत चांगलाच संतोष पावला. आणि त्या मुलांना म्हणाला,

'मुलांनो, हा हां जादूचा हिरा ध्या. हा तुमच्या जवळ असता तुमच्या जीवाला कोणतांच अपाय होणार नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा हा हिरा फक्त एकाच मानवाचा बळी घेऊं शकेल. तेव्हां याचा उपयोग शक्य तों त्या राक्षसासाठींच करा असें म्हणून त्या साधूनें त्यांना शुभाशीर्वाद दिला. आणि एकाएकी तो हवेंत विलीन झाला.

ते दोघे राजपुत्र आपल्या घोडयावर बसून थोडक्यांच दिनसांच्या अवधींत रूपनगरच्या राजधांनीत येऊन पोहोंचले असतील नसतील तोंच . .

त्या राक्षसाचें सैन्य ह्या दोघां राजपुत्रांवर चालून आलें परंतु त्या जादूच्या हिऱ्याच्या प्रभावांमुळें राजपुत्र राक्षसाच्या सैन्याला बळी न पडतां राजपुत्रांच्या तलवारीला पुष्कळसें राक्षस बळी पडल्याचें पाहतांच प्रत्येकजण जीव घेऊन पळत सुटला. अशाप्रकारे राक्षसाच्या सैन्याची त्रेधातिरपिट उडवून हे दोघें शूर वीर राजपुत्र धिमेपणानें राजवाडयाकडे पावले टाकू लागले.

सगळा राजवाडा पाहून देखील त्या दोघांना जादूगार

राक्षस सांपडला नाहीं. अखेर शेवटीं त्या दोघांनीं त्या राक्षसा अंत:पुरांत गाठलेंच

त्या दोघां राजपुत्रांना पाहतांच राक्षसानें निरनिराळे प्रभावी मंत्र म्हण्यास सुरवात केली, परंतु मंत्राचा अुपयोग होत नाहीं असें पाहून त्यानें अस्त्रांचाहि अुपयोग करण्यास सुरवात केली. परंतु त्याचाहि अुपयोग होत नाहींसा पाहून राक्षस अति-शय संतापला.

हें दृष्य पाहतांच राजहंसानें त्या राक्षसासमोर शेल्यांत गुंडाळलेला हिरा धरला. तत्क्षणींच त्या हिऱ्यांतून ज्वालाग्राही किरणें निघून तो जादूगाराचा वेध घेउं लागला आणि थोडक्याच वेळांत तो राक्षस मोठमोठ्यानें आरडाओरड करीत खालीं पडला.

राक्षस मरून पडलेला पाहतांच त्याच्या गळ्यांतील आपला रत्नजडीत ताअीत काढला आणि राजहंसानें तो आपल्या गळ्यांत घालताच प्राणहंसाला अतिशय आनंद झाला.

रूपनगराचा सर्व राज्य कारभार तेथील प्रधान मंडळाच्या देखरखीखालीं देऊन तें दोघे राजपुत्र लवकरच आपल्या सौभाग्य नगरांत आले.

आपल्या राजघराण्याचें वैभव आपल्या मुलांनीं परत आण-लेलें पाहताच राजाला अतिशय आनंद झाला

पुढें लवकरच सौभाग्य नगराचे राज्यपद राजहंसाला देऊन आणि रूपनगरचें राज्यपद प्राणहंसाला देऊन राजा ईश्वरप्राप्ती-साठीं भजन पूजन करण्यांत मग्न होऊं लागला.

IRBK-0116448